ARTHA, Poona 4

उद्योगधंदे, बँकिंग, अर्थशास्त्र, व्यापार, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें प्रमुख मराठी वृत्तपत्र

स्थापना : १९३५

# अर्थ

" अर्थ एव प्रधानः " इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक महिन्याच्या पहिल्या व तिसऱ्या बुधवारीं प्रसिद्ध होतें.

वार्षिक वर्गणी : ६ रु.

दुर्गाधिवास, पुणें ४.

LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT
Reg. No. B. 3434. Licence No. 53.

वर्ष २८ पुणें, बुधवार तारीख २४ जानेवारी, १९६२ अंक १

## विविध माहिती

**बोनस देण्यासंबंधीं करार**—भिलई येथील पोलादाच्या कारखान्याचे चालक आणि कामगार संघटना ह्यांच्यांत उत्पादन बोनस देण्यासंबंधीं करार करण्यांत आला आहे. कामगार संघटनेचें नेतृत्व हिंदी राष्ट्रीय ट्रेड युनिअन संघटनेकडे आहे. ह्या कराराचा फायदा सुमारें १४,००० कामगारांना मिळणार आहे. कराराची मुदत दोन वर्षांची आहे. प्रत्येक विभागासाठी ठरविण्यांत आलेल्या उत्पादन-लक्ष्याच्या ५० टक्के उत्पादन झाल्यावर कामगारांना बोनस मिळणार आहे.

**भारतासाठी विद्युत्-यंत्रसामग्री**—मेटुर येथें उभारण्यांत यावयाच्या जलविद्युत् केंद्रासाठी लागणाऱ्या एका टर्बाइनचा नकाशा सोव्हिएट तज्ज्ञांनीं मंजूर केला आहे. हा टर्बाइन अद्यावत् पद्धतीचा असेल व त्याच्या साह्यानें ५६,००० किलोवॅट वीज उत्पन्न करतां येईल. ह्याशिवाय लेनिनग्रॅड येथील विद्युत् यंत्र-सामग्रीच्या कारखान्यांत ५०,००० किलोवॅट वीज निर्माण करूं शकणारी वाफेचीं दोन टर्बाइन्स भारतासाठी तयार करण्यांत येत आहेत.

**विदेशी उद्योगधंद्याची मदत**—इंडिअन इन्व्हेस्टमेंट सेंटर ह्या संघटनेकडे परदेशांतील कारखान्यांकडून मिळूं शकणाऱ्या तांत्रिक मदतीसंबंधीं बऱ्याच विचारणा करण्यांत येत आहेत. तांत्रिक मदतीप्रमाणेंच आर्थिक साह्यासंबंधींहि विचारणा होत आहेत. सुमारें ३० कोटी रुपये भांडवल असलेल्या अनेक उद्योगधंद्यांना असें साह्य हवें आहे. उलटपक्षी, पश्चिम युरोप व अमेरिका ह्यामधील कारखानदारहि हिंदी भागीदारांच्या शोधांत आहेत.

**दोन कारखान्यांचें सहकार्य**—ब्रिटनमधील रोल्स राइस मोटारीचा कारखाना आणि ब्रिटिश मोटार कॉर्पोरेशन ह्यांच्यांत तांत्रिक सहकार्य घडवून आणण्याचे प्रयत्न चालू आहेत. रोल्स राइस कंपनीचीं मोटारचीं एंजिनें विशेष चांगल्या दर्जाचीं असून ब्रिटिश मोटार कॉर्पोरेशनचा मोठ्या प्रमाणांत उत्पादन करण्याचा हातखंडा आहे. दोन्ही कारखान्यांच्या सहकार्यानें कुटुंबांना लागणारी छोटी मोटारगाडी तयार करण्यांत येणार आहे.

**सिलोनचें आयुर्विमा कॉर्पोरेशन**—सिलोनच्या सरकारनें आयुर्विम्याच्या धंद्यासाठी कॉर्पोरेशनची स्थापना केली आहे. कॉर्पोरेशननें आपल्या धंद्याला १ जानेवारी, १९६२ ला प्रारंभ केला व पहिली विमा पॉलिसी सीलोनच्या मुख्यप्रधान श्रीमती बंदरनायके ह्यांना दिली. कॉर्पोरेशनची संघटना करण्यासाठी भारताच्या आयुर्विमा कॉर्पोरेशनचे कांहीं तज्ज्ञ सीलोनला गेले होते, त्यांत श्री. राजगोपालन प्रमुख होते.

**जपानी अभ्यासकांचा दौरा**—जपानमधील अभ्यासकांची एक तुकडी भारताच्या दौऱ्यावर आली आहे. हिंदमधील लोकांच्या आहारविषयक संवयी, उष्ण कटिबंधामधील प्रदेशांतील रोग, त्यांवर करण्यांत येणारे उपाय, इत्यादि विषयांचा अभ्यास ते करणार आहेत. विशेषतः आयुर्वेद उपचारपद्धति व तिची कार्य-क्षमता ह्याच्यावर लक्ष केंद्रित करण्यांत येणार आहे.

**परदेशीय कर्जावरील मदार**—ऑल इंडिआ कॉमर्स असोसिएशन ह्या संघटनेची १५ वी वार्षिक परिषद् विशाखापट्टम् येथें भरली होती. परिषदेचे अध्यक्ष श्री. मदनमोहन रुइआ ह्या प्रसंगीं बोलतांना म्हणाले कीं, भारताच्या औद्योगिक विकासासाठी परदेशांच्या मदतीवर बरीच मदार ठेवण्यांत येत आहे. परंतु ही गोष्ट देशाच्या दीर्घकालीन हिताच्या दृष्टीनें योग्य नाहीं.

**कुटुंबनियोजनासाठी साह्य**—तिसऱ्या पंचवार्षिक कार्य-क्रमाच्या कालांत कुटुंबनियोजनासाठी देण्यांत येणारें आर्थिक साह्य वाढविण्यांत आलें आहे. प्रत्येक जिल्ह्यांत कुटुंब नियोजना-संबंधी सल्ला देणारें एक फिरतें केंद्र स्थापन करण्यांत येणार आहे. ग्रामीण भागांत कुटुंबनियोजन केंद्र स्थापन करण्याची तयारी असणाऱ्या ऐच्छिक संघटनांनाहि मदत देण्यांत येणार आहे.

**सिकीममध्यें शेतकी संशोधन संस्था**—पश्चिम सिकीममध्यें शेतीविषयक संशोधन करणारें एक केंद्र भारत सरकारच्या मदतीनें स्थापन करण्यांत येणार आहे. ह्या केंद्रासाठी २०० एकर जमिनीवर पसरलेली शेती संघटित करण्यांत येणार आहे. सिकीम राज्यांतील शेतीचें उत्पन्न वाढविण्यासाठी हा उपक्रम करण्यांत येत आहे.

**नागपूर कॉर्पोरेशनच्या नोकरांचें वेतन**—नागपूर कॉर्पोरेशनच्या ज्या नोकरांचा पगार दरमहा ३०० रुपयांपेक्षा कमी असेल त्यांना महाराष्ट्र सरकारच्या ठरावाप्रमाणें जादा महागाई भत्ता देण्यांत येणार आहे. महागाई भत्त्याच्या वाढीमुळें ५,००० नोकरांचा मुशाहिरा वाढेल व त्यासाठी कॉर्पोरेशनला दरमहा ५०,००० रुपये अधिक खर्च येईल.

**गुजरातमधील साखरेचे कारखाने**—गुजरात राज्य सहकारी साखर कारखाना संघाच्या अध्यक्षांनीं अशी तक्रार केली आहे कीं, गुजरात राज्यांत साखरेचा धंदा वाढविण्याच्या कामीं मध्यवर्ती सरकार उदासीनता दाखवीत आहे. साखरेच्या कारखान्यांना परवाने देण्याच्या बाबतींत इतर राज्यांना सवलतीनें वागविण्यांत येत आहे. गुजरातमध्यें अवघे तीन साखरेचे कारखाने असून ते राज्याच्या साखरेच्या गरजेपैकी १५ टक्के गरजच फार तर भागवूं शकतील असें त्यांचें म्हणणें आहे.

**पूरग्रस्तांसाठी राहण्याच्या जागा**—पानशेत व खडकवासला धरणें फुटून आलेल्या महापुरामुळें पोस्ट व तारखात्यांत काम करणारे ३०० नोकर बेघर झालेले आहेत. पूर येऊन गेल्यावर त्यांची राहण्याची कायमची सोय लवकरच करणार असल्याचें आश्वासन खात्याच्या मंत्र्यांनीं दिलें होतें; परंतु पोस्टमास्टर जनरल, श्री. लाल ह्यांनीं जाहीर केलें आहे कीं नोकरांसाठी बांधावयाचे राहण्याचे गाळे पावसाळ्यापूर्वी तयार होणार नाहींत.

**नव्या पुलाचें बांधकाम**—गुजरात राज्यांतील कांडला बंदर आणि कच्छचा भाग ह्यांना जोडणाऱ्या एका मोठ्या पुलाचें काम सुरू करण्यांत आलें आहे. पुलाच्या पायाभरणीचा समारंभ नुकताच झाला. पुलाच्या बांधणीसाठी १ कोटी रुपयांपेक्षा अधिक खर्च येणार आहे. पुलाची लांबी ३,९४२ फूट होईल आणि तो अद्यावत् पद्धतीचा बांधण्यांत येईल.

**अहमदाबाद येथील विमानतळ**—अहमदाबाद येथील विमानतळावरील घसरपट्टी मजबूत करण्याचें काम हल्लीं घेण्यांत आलें होतें. ह्या कामासाठी १४ लाख रुपये खर्च आला असून तें लवकरच पूर्ण होईल. घसरपट्टी ६,००० फूट लांबीची आहे. त्यांपैकी ५,६०० फुटांचें काम झालें आहे. उरलेलें काम पूर्ण झाल्यावर अधिक जड विमानें तळाचा उपयोग करूं शकतील.

**चीनची ब्रह्मदेशाला मदत**—चीननें ब्रह्मदेशाच्या सरकारला ४० कोटी रुपयांचें कर्ज दिलें आहे. ह्या कर्जाचा उपयोग करून ब्रह्मदेश एक वीजकेंद्र, एक मोठा पूल, मोटारींच्या टायर्स तयार करण्याचा एक कारखाना, एक कापडाची गिरणी, इत्यादि उभारणार आहे. आर्थिक मदतीबरोबर चीन तंत्रज्ञांची सल्लामसलतहि देणार आहे.

**पंचायतींसाठी रेडिओ**—१९६२ च्या अखेरीपर्यंत मद्रास राज्यांतील सर्व पंचायतींना रेडिओ पुरविण्यांत यावेत, असा निर्णय राज्य सरकारनें घेतला आहे. राज्यांतील १२,५०० पंचायतींपैकी ८,००० पंचायतीजवळ अद्याप रेडिओ नाहीं. चालू आर्थिक वर्षांत ५०० पंचायतींना सेट्स पुरविण्यांत येतील. रेडिओ विकत घेण्यासाठी पंचायतींना सरकारकडून आर्थिक मदत देण्यांत येत असते.

**मद्रास राज्यांत खताचा कारखाना**—मद्रास राज्यांत तुतिकोरीन ह्या ठिकाणीं खताचा कारखाना काढण्याचा परवाना मध्यवर्ती सरकारनें दिला आहे. हा कारखाना खाजगी मालकीचा राहील. मेसर्स कोठारी अँड सन्स ह्या कंपनीनें एका अमेरिकन कारखान्याच्या सहकार्यानें तो काढण्याचें ठरविलें आहे. सुरुवातीला ह्या कारखान्यांत ३३,००० टन खत तयार करणारी यंत्रसामग्री बसविण्यांत येईल. नंतर त्याची उत्पादनक्षमता वाढविण्यांत येणार आहे.

**बनारसमध्यें बुद्धविहार**—बनारसमध्यें बांधण्यांत येणाऱ्या बुद्धविहाराच्या इमारतीचा पायाभरणी समारंभ ब्रह्मदेशाचे पंतप्रधान श्री. उ नू ह्यांचे हस्तें झाला. विहाराच्या इमारतीसाठी ५० हजार रुपये खर्च येणार असून त्यांत बनारस विद्यापीठांत शिकणाऱ्या ब्रह्मी विद्यार्थ्यांची सोय करण्यांत येणार आहे. इमारतीचा खर्च ब्रह्मदेशांतील एका दैनिकाचे मालक देणार आहेत. बौद्ध तत्त्वज्ञानाचें संशोधन करण्याचें केंद्र म्हणून विहार चालविण्यांत येईल.


समान ध्येयांच्या पूर्तीसाठीं

"ऐक्य कशांत असतें आणि तें उत्तम रीतीनें कसें घडवून आणतां येईल? उत्तर सोपें आहे. आपले हेतु, आपलीं ध्येयें व आपलीं दुःखें समान असणें यांतच तें समावलेलें आहे. समान ध्येयांच्या पूर्तिसाठीं सहकार्य करणें, परस्परांच्या दुःखांत सहभागी होणें व परस्परांबद्दल सहिष्णुता बाळगणें हाच ऐक्यवर्धनाचा उत्तम मार्ग होय."

— महात्मा गांधी

राष्ट्रपित्याचे हे उद्गार कधीं नव्हते एवढे आज सत्य वाटतात. त्यांचे हे उद्गार लक्षांत घेऊन आपण एका कुटुंबाप्रमाणें एकत्र राहून महाराष्ट्राच्या आणि भारताच्या हितासाठीं झटूं या!



प्रकाशन संचालक, महाराष्ट्र सरकार, मुंबई



दातांच्या स्वच्छतेसाठीं

☆ माकडछाप म्हणजेच काळी टूथ पावडर ☆

# अर्थ

बुधवार, ता. १४ जानेवारी, १९६२





संस्थापक :
प्रा. वामन गोविंद काळे

संपादक :
श्रीपाद वामन काळे


## परदेशी प्रवाश्यांना नवें आकर्षण

गेल्या कांहीं वर्षांत भारतांत येणाऱ्या परदेशीय प्रवाश्यांची संख्या वाढत चाललेली आहे. भारतामधील प्रेक्षणीय स्थळें पाहण्यासाठी ते येतात आणि त्यांच्या आगमनामुळें भारताला परदेशीय चलनाची चांगली प्राप्ति होते. अशा प्रेक्षणीय स्थळांत आतां आणखी एका स्थळाची भर पडली आहे. हें नवें स्थळ म्हणजे गोवा. गोव्यांतील निसर्गसौंदर्य अप्रतिम आहे. तांबड्या मातीची हिरवीगार शेती आणि ओढेनाले ह्यांची समृद्धि गोव्यांत आहे. गोव्यांत हिंदूंचीं प्राचीन देवळेंहि आहेत. हजारों हिंदु कुटुंबें आपआपल्या कुलदैवतांचें दर्शन घेण्यासाठी दरसाल गोव्यांत जात असतात. गोवा पोर्तुगिजांच्या अंमलाखाली होता तेव्हां गोव्याला जाण्याच्या मार्गांत असणाऱ्या अडचणी आतां दूर होण्याच्या मार्गावर आहेत. त्यामुळें भारताच्या इतर भागांतून येणाऱ्या यात्रेकरूंची संख्या आतां अधिकच वाढेल. पोर्तुगीज राज्यकर्त्यांनीं बांधलेलीं भव्य प्रार्थनामंदिरें भाविक ख्रिश्चन लोकांना आकर्षून घेत असतातच. युरोप-अमेरिकेकडून येणाऱ्या विलासी बोटी मार्मगोवा बंदरांत थांबविण्यांत आल्या तर परदेशीय प्रवाश्यांचा ओघ वाढतच जाईल, पण ह्या बाबतींत एक अडचण आहे. गोव्यांत राहण्याची व वाहतुकीची सोय अधिक चांगली करण्यांत आली पाहिजे. ह्या बाबतींत सध्यांची परिस्थिति फारशी अनुकूल नाहीं. गोव्यांतील खनिज संपत्तीकडे उद्योगपतींचें व सरकारचें लक्ष जात आहे व जाईलहि. परंतु हौशी प्रवाश्यांचा धंदा मोठ्या प्रमाणावर चालण्याची शक्यता आहे इकडेहि लक्ष देण्यांत आलें पाहिजे. पोर्तुगिजांची ही आजपर्यंतची वसाहत कशी आहे तें पाहण्याची उत्सुकता राजकारणी लोकांनाहि आहे.

## कॅन्सरच्या रोगाला तंबाखू कारण

कटक येथें सायन्स कॉंग्रेसचें ४९ वें अधिवेशन भरविण्यांत आलें होतें. अधिवेशनाच्या निमित्तानें निरनिराळ्या शास्त्रीय क्षेत्रांतील तज्ज्ञ व संशोधक आलेले होते. ह्या तज्ज्ञांकडून सामान्य नागरिकांना समजेल अशा भाषेंत व्याख्यानें देण्याची सोय करण्यांत आली होती. पश्चिम जर्मनींतील एक वैद्यकीय संशोधक डॉ. ड्रुकरे ह्यांनीं कॅन्सर ह्या रोगासंबंधीं व्याख्यान दिलें. ते आपल्या भाषणांत म्हणाले कीं, भारतांत विड्याचें पान खाऊन त्यावर तंबाखू चघळण्याची संवय पुष्कळ लोकांना असल्याचें दिसून येतें. ह्या संवयीमुळें भारतांत तोंडांतील कॅन्सर अधिक प्रमाणांत आढळून येतो. पण तंबाखूच्या फक्त ह्याच उपयोगामुळें कॅन्सर होण्याचा संभव वाढतो असें नाहीं. ह्या बाबतींत झालेल्या संशोधनांत असें आढळून आलें आहे, कीं ६० वर्षे वयापुढील जे लोक एकसारखें धूम्रपान करतात त्यांना फुफ्फुसाचा कॅन्सर होण्याचा संभव फार असतो. त्यांतहि पाइप आणि सिगर ओढणाऱ्या लोकांना कॅन्सरचा धोका अधिक असतो. मरणापासून वांचण्याकरितां आत्महत्या करणें जितकें मूर्खपणाचें असतें तितकेंच तंबाखू चघळून अगर धूम्रपान करून कॅन्सरचे बळी होणें मूर्खपणाचें आहे. युरोप आणि अमेरिका ह्यासारख्या उद्योगप्रधान देशांत वयाच्या सर्व गटांतील लोकांत धूम्रपानाचें व्यसन फैलावलेलें आहे. त्यामुळें ह्या देशांतून कॅन्सर झालेल्या लोकांचें प्रमाण झपाट्यानें वाढत आहे. भारतांत अशी परिस्थिति नाहीं. परंतु येथील लोकांत तंबाखू चघळण्याची संवय बरीच पसरलेली आहे. त्यामुळें तोंडांतील अगर श्वासनलिकेंतील कॅन्सर होण्याची शक्यता असते.

## तिसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमांतील अडचणी

अखिल भारतीय कारखानदार संघाच्या मध्यवर्ती कमिटीची तिसरी तिमाही बैठक अहमदाबाद येथें भरली होती. तिसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमांत उद्योगधंद्यांच्या क्षेत्रांत जीं उद्दिष्टें ठरविण्यांत आलीं आहेत तीं गांठतां येतील कीं नाहीं, ह्याविषयीं कमिटीनें शंका व्यक्त केली आहे. ह्यासंबंधीं मंजूर केलेल्या ठरावांत कमिटीनें पुढील आशयाचे विचार व्यक्त केले आहेत. सध्यां देशांत वाहतुकीच्या सोयींची, औद्योगिक शक्तीची, कोळशाची, लोखंडाची, पोलाद व इतर धातूंची टंचाई बरीच जाणवत आहे. ह्या परिस्थितींत लवकर सुधारणा झाली नाहीं तर बहुतेक उद्योगधंद्यांना आपआपलीं उत्पादनाचीं उद्दिष्टें प्रत्यक्षांत उतरविणें अवघड जाणार आहे. उद्योगधंद्यांच्या विस्तारासाठी लागणाऱ्या मूलभूत सोयींची अतिशय टंचाई असल्यानें उत्पादन वाढण्याच्या बाबतींत कठीण अशा अडचणी उत्पन्न होत आहेत. त्यामुळें होत असलेल्या उत्पादनाचा खर्चहि वाढत चालला आहे आणि त्याचा परिणाम भारताच्या निर्यातीच्या बाजारपेठांवर होत चालला आहे. अलीकडे भारतांत बऱ्याच ठिकाणीं खनिज तेलाचे साठे सापडलेले आहेत. औद्योगिक भट्ट्यांतून कोळशाऐवजीं तेल वापरण्यास उत्तेजन देण्यात यावें. म्हणजे कोळशाच्या पुरवठ्यावर व त्याच्या वाहतुकीवर पडणारा ताण कमी होण्यास मदत होईल. औद्योगिक जळणासाठी तेलाचा उपयोग वाढविण्यासाठी म्हणून कांहीं सूचनाहि कमिटीनें केल्या आहेत. दुसऱ्या एका ठरावानें पोलाद, कोळसा, सिमेंट व इतर औद्योगिक कच्च्या मालाच्या किंमतीबाबत सरकारनें वाजवी धोरण ठेवावें आणि ह्या मालावरील मध्यवर्ती व राज्यसरकारांच्या कराचा बोजा कमींत कमी ठेवावा, अशी सूचना करण्यांत आली आहे.

## बँकांच्या व्यवहाराबद्दल सल्ला

सेंट्रल बँकेच्या सुवर्णमहोत्सवाच्या निमित्तानें देण्यांत आलेल्या उद्यानोपाहाराला मध्यवर्ती सरकारचे अर्थमंत्री श्री. मुरारजी देसाई हजर होते. ह्या प्रसंगीं बोलतांना ते म्हणाले कीं, प्रामाणिक आणि चारित्र्यवान् लोकांना बँकेनें कर्जें देण्यास मागेंपुढें पाहूं नये. प्रगत देशांत अशा प्रकारानें कर्जें देण्याची सोय आहे. तारण घेऊन कर्जें देण्यांत येत असतातच; पण वैयक्तिक पात्रतेवर आणि सचोटीवर कर्जें देण्यांत बँकांनीं पुढाकार घेतला पाहिजे. अशीं कर्जें देण्यांत आलीं तर भारतांत उद्योगधंद्यांची व व्यापाराची वाढ होणें सुलभ होईल.

## कंपन्यांच्या शेअर्सवरील कर्जे
### मार्जिन ५०% चें ४०% केलें

जॉइंट स्टॉक कंपन्यांच्या ऑर्डिनरी भागांचे तारणावर द्यावयाच्या कर्जास कर्मीत कमी ५०% चें मार्जिन असावें, असा निर्बंध रिझर्व्ह बँकेनें सर्व बँकांवर दि. ११ मार्च, १९६० रोजीं घातला होता. कारण, त्याच्या आधीं शेड्यूल्ड बँकांचीं ऑर्डिनरी भागांचे तारणावरील कर्जे एकसारखीं वाढत चाललीं होतीं. ह्या नियंत्रणानंतर मात्र, नवे शेअर्स बाजारांत येऊनहि आणि शेअर्सच्या किंमती वाढूनहि, अशा कर्जाची एकूण रक्कम गेल्या सुमारें २१ महिन्यांत ८० ते ८३ कोटी रुपयांच्या आसपास स्थिर राहिली. डिसेंबर, १९६१ पासून सर्व स्टॉक एक्सचेंजवरती नियंत्रणें अंमलांत आलीं आहेत, त्यामुळें व्यवहारांची शिस्त वाढली आहे. तेव्हां आतां हें मार्जिन ५०% चें ४०% करण्याचें रिझर्व्ह बँकेनें ठरवून तसें जाहीर केलें आहे.

### दि बँक ऑफ कराड लि. चें पुढें पाऊल

दि बँक ऑफ कराड लि. मध्यें दि प्रेसिडेन्सी इंडस्ट्रिअल बँक लि. विलीन करण्याची योजना आतां पुरी होत आली आहे. कराड बँकेच्या भागदारांनीं आणि प्रेसिडेन्सी बँकेच्या ठेवीदारांनीं तिला मान्यता दिली आहे. हायकोर्टाची मंजुरी मिळतांच ती अंमलांत येईल आणि कराड बँकेच्या मुंबई आणि पुणें ह्या महत्त्वाच्या ठिकाणीं कचेऱ्या सुरू होतील. कराड बँकेच्या वाढणाऱ्या व्यवहाराला जादा भाग भांडवलाची आवश्यकता असल्यानें, त्या बँकेचें अधिकृत भांडवल आतां १५ लक्ष रुपये करण्यांत आलें आहे. त्यापैकी ६½ लक्ष रुपयांचे भाग ( प्रत्येकी १०० रु. चे ६,५०० भाग ) कंट्रोलर ऑफ कॅपिटल इश्यूजच्या मंजुरीनें तुर्त विक्रीस काढण्यांत येतील. प्रत्येक भागाच्या पोटीं ५० रु. वसूल केले जातील.

बँक ऑफ कराडची स्थापना १९४६ सालांतील असून १९६० अखेर तिचें वसूल भांडवल २ लक्ष, ३१ रु. आणि गंगाजळी ९६ लक्ष रु. होती. ठेवी ४३½ लक्ष रु. च्या होत्या. बँकेच्या ५ कचेऱ्या होत्या आणि तिनें ७% डिव्हिडंड दिलें होतें. प्रेसिडेन्सी बँक स्वतःमध्यें विलीन करून घेऊन आणि वसूल भांडवलांत वाढ करून कराड बँक आत्मविश्वासानें पुढें पाऊल टाकीत आहे.

### हवाई वाहतुकींत झालेली वाढ

एअर इंडिआ इंटरनॅशनल आणि इंडिअन एअर लाइन्स कॉर्पोरेशन ह्यांचे सहामाही अहवाल प्रसिद्ध करण्यांत आले आहेत. त्यावरून असें दिसून येतें कीं, १९६० सालच्या पहिल्या सहामाहीपेक्षा १९६१ च्या पहिल्या सहामाहींत उतारू, माल आणि टपाल ह्यांची अधिक वाहतूक करण्यांत आली आहे. ह्याच अवधींत एअर इंडिआनें भारत-जपान आणि भारत-नैरोबी ह्या मार्गावर बोइंग ७०७ ह्या विमानानें वाहतूक सुरू केली. त्याचप्रमाणें अमेरिकेला जाणाऱ्या सेवा आठवड्यांतून २ होत्या, त्या ५ केल्या. त्याशिवाय वाराणसी येथील विमानतळावर नवी इमारत बांधली आणि आर. जी. १ ह्या ग्लायडरचें उत्पादन केलें. ह्या ग्लायडरची चांचणी गेल्या मे महिन्यांत करण्यांत आली.

### बोटवाहतूक कंपनीला कर्ज

भारत सरकारनें जयंति शिपिंग कंपनीला कर्ज देण्याला तत्वतः मान्यता दिली आहे. कर्जाच्या अटी आणि तपशील अद्याप ठरावयाचा आहे. कर्जाचा उपयोग करून जपानकडून ८ मोठ्या बोटी बांधवून घेण्याचा कंपनीचा विचार आहे. ह्या बोटींचा उपयोग अन्नधान्य आणि खनिजें ह्यांच्या वाहतुकीसाठी करण्यांत यावयाचा आहे. कर्जाची रक्कम १५ ते १६ कोटी रुपये असेल असा अंदाज आहे.

### वैमानिकांना अधिक वेतन

ब्रिटिश विमानकंपन्यामधील जे वैमानिक माकडें व इतर प्राण्यांची ने-आण करतात त्यांच्या वेतनांत औद्योगिक कोर्टानें वाढ केली आहे. ह्या प्राण्यांची वाहतूक अलीकडे वाढली असून त्यांचा सहवास वैमानिकांना फार तापदायक वाटतो.

### चीन-अल्बानिआ बोट कंपनी

चीन आणि अल्बानिआ ह्या दोन देशांनीं संयुक्त मालकीची बोट वाहतूक कंपनी स्थापन करण्याचें ठरविलें आहे. गेल्या वर्षी रशिआ व अल्बानिआ ह्यांच्यांत राजकीय वैषम्य आल्यापासून चीन अल्बानिआला पाठिंबा देत आलेला आहे.

## "अर्था"ला २८ वें वर्ष लागलें.

न्यायमूर्ति रानड्यांचे शिष्य व निस्सीम अनुयायी, भारतांतील सुविख्यात व कर्तबगार अर्थशास्त्रज्ञ प्राध्यापक वा. गो. काळे यांनीं "अर्थ" या साप्ताहिकास सुरुवात करून २७ वर्षे पुरीं होत आहेत. सुरुवातीस कांहीं काळ खुद्द कै. वामनरावजींचें नेतृत्व अर्थास लाभलें. त्यांच्या निधनानंतर, आजपावेतों, त्यांचे चिरंजीव श्री. श्री. वा. काळे यांनीं अत्यंत निष्ठेनें "अर्थ" चालविला आहे. केवळ अर्थविषयक प्रश्नांची चर्चा करणारें व माहिती देणारें पत्र मराठींत २७ वर्षे सातत्यानें प्रसिद्ध होत राहते हीच गोष्ट कौतुकाची मानली पाहिजे; याचें सर्व श्रेय श्री. श्रीपादरावांची निष्ठा व चिकाटी या गुणांबरोबरच त्यांचें कौशल्य व योजकता यांसहि दिलें पाहिजे. मराठी वृत्तपत्रीय सृष्टींत "अर्थ" वैशिष्ट्यपूर्ण कामगिरी बजावीत आहे.

— ध. रा. गाडगीळ

महाराष्ट्रांतील नियतकालिकांत राजकीय, सामाजिक अथवा ललित साहित्याला वाहिलेल्या वर्तमानपत्रांची व मासिकांची संख्याच फार मोठी आहे. त्या मानानें आर्थिक विषयाचा ऊहापोह करणारीं पत्रें क्वचितच आढळतात. याचें कारण उघड आहे. अशा पत्राचें संपादन करण्यास फार अभ्यास व परिश्रम लागतात आणि प्रसाराला वाव मात्र अगदीं बेताचा.

अशी वस्तुस्थिति असतां गेलीं २७ वर्षे चुकूनहि खंड पडूं न देतां "अर्थ" सारखें एक उत्कृष्ट पत्र आपल्या वाडिलांच्या थोर परंपरेला शोभेल असें चालवून श्री. श्रीपादराव काळे यांनीं महाराष्ट्राची जी सेवा केली आहे, तिचें मोल खचित फार मोठें ठरेल.

— शं. वा. किर्लोस्कर.

### सांगली जिल्हा को-ऑ. लँड मार्गेज बँक लि.

ही संस्था नव्यानेंच १-१०-१९६१ पासून शेतकऱ्यांना लांब मुदतीचीं कर्जे देऊन त्यांच्या जमिनींची सुधारणा करून त्यांची आर्थिक उन्नति करण्यासाठीं सहकारी क्षेत्रांत उतरली आहे. आतांपर्यंत तिनें दीड लाखापर्यंत कर्जवांटप केलें आहे. सातारा जिल्ह्याच्या कलेक्टर साहेबांनीं सातारा जि. को-ऑ. लँड मॉ. बँकेस जें सहकार्य केलें त्याच पद्धतीचें सहकार्य या जिल्ह्याचे लोकप्रिय कलेक्टर यांनीं या बँकेस देण्याचें ठरविलें असल्यानें तिचे व्यवहार ताबडतोब वाढण्यास चांगलीच मदत होणार आहे. या बँकेच्या चेअरमनपदीं श्री. आबासाहेब गणपतराव शिंदे ( म्हैसाळकर ) असल्यानें त्यांच्या मौलिक मार्गदर्शनाची व बँकेच्या संचालक मंडळाच्या तडफदार सभासदाचे सहकार्याची या बँकेची आर्थिक स्थिती भक्कम पायावर उभारण्यास चांगलीच मदत होईल.

---

### जनता सहकारी बँक लि., सांगली

१७ डिसेंबर, १९५९ रोजीं सुरू झालेल्या जनता सहकारी बँक लि., सांगली, या बँकेनें एका वर्षात भरपूर प्रगति केली आहे.

बँकेनें आपलें खेळतें भांडवल रु. १,८८,००० वरून रु. ७,३६,००० वर नेलें आहे व कामकाज सुरू झालेनंतर आपल्या शेअर भांडवलांत ३६,३४५ रुपयांची वाढ केली आहे. ठेवीमध्येंहि रु. १,७२,५०० ची वाढ झालेली आहे. बँकेचा संस्थापक आणि संचालक वर्ग, हितेच्छू व या बँकेचा दैनंदिन उपयोग करून घेणारे सांगली येथील व्यापारी आणि बँकेचे उत्साही मॅनेजर श्री. पांड्याजी यांच्यासह सर्व स्टाफ, या सर्वांचे प्रयत्नानें आज बँक प्रगतीपथावर चालली आहे.

या बँकेचे चेअरमन श्री. एम. एस. कराळे व व्हा. चेअरमन श्री. आमदार वसंतरावजी पाटील हे असून, संचालक मंडळांत श्री. एस. एस. मालू, श्री. वनेचंद प्रे. शहा, श्री. तात्यासो शा. पाटील, श्री. चुनिलाल भ. काबरा, श्री. गो. शि. दिक्षीत, श्री. रमणलाल म. शहा, श्री. गुलाबराव र. पाटील ( सांगली जि. म. सहकारी बँक लि. चे नॉमिनी ) ही मंडळी आहेत.

ठेवीदार व खातेदार यांचें बँकेला सहकार्य वाढत राहून बँक प्रगतिपथावर द्रुतगतीनें वाटचाल करीत राहील असा विश्वास आहे.

### भारतामधील कापसाची लागवड खर्चाची

भारतामधील कापसाच्या लागवडींसंबंधींच्या प्रश्नांचा विचार करण्यासाठीं १० वी कापूस परिषद भरली होती. ह्या परिषदेचें उद्घाटन करतांना मध्यवर्ती सरकारचे अन्न व शेतकी मंत्री श्री. स. का. पाटील म्हणाले कीं भारतामधील कापसाची लागवड दिवसेंदिवस खर्चाची होत चालली आहे. कापसाच्या उत्पादनाचा खर्च वाढला कीं त्याच्या विक्रीची किंमतहि वाढते आणि खर्च व किंमत ह्यांचा पाठशिवणीचा हा खेळ चालू रहातो. ह्या गोष्टीकडे शेतीसंबंधीं संशोधन करणाऱ्यांनीं आणि विकास योजनेंत काम करणाऱ्यांनीं लक्ष दिलें पाहिजे. ह्या दोघांनींहि आपल्या प्रयोगांची व कार्याची फलनिष्पत्ति शेतकऱ्यापर्यंत नेऊन पोंचविली पाहिजे. त्यांनी असें केलें तर शेतकऱ्याला लागवडीच्या आधुनिक पद्धति वापरतां येतील आणि शास्त्रीय शोधांचा उपयोग करून कापसाचें उत्पादन भरपूर प्रमाणांत करतां येईल. त्यामुळें, कापूस-उत्पादनाच्या खर्चीतहि बचत होईल आणि भारताला देशांतर्गत आणि परदेशांतील कापसाच्या बाजारपेठांत स्पर्धा करतां येणें शक्य होईल. सध्या कापसाची लागवड जेवढ्या जमिनींत करण्यांत येते तेवढ्याच जमिनींतून अधिक पीक काढण्याचे प्रयत्न करण्यांत आले पाहिजेत. कारण, कापसाखालीं अधिक जमीन आणण्याची शक्यता नाहीं. कमी खर्चांत अधिक उत्पादन होऊं शकलें तरच कापसाचे बाजारपेठेंतील भाव वाजवी पातळीवर स्थिर राखतां येतील. कापसाच्या लागवडींत सुधारणा करण्यासाठीं सरकार शेतकऱ्यांना चांगली जमीन, खतें, निश्चित पाणीपुरवठा, तांत्रिक ज्ञान, इत्यादि बाबतींत मदत करीत आहे. त्याचा फायदा घेऊन शेतकऱ्यांनी कापसाच्या उत्तमोत्तम जाती तयार केल्या पाहिजेत.

---

**रावळपिंडीजवळ तेल सांपडलें**—रावळपिंडीच्या जवळ असलेल्या एका गांवीं ट्यूब वेल खोदण्याचें काम चालू असतां तेल लागल्याची वातमी आहे. विहिरीची खोली ३९० फुटापर्यंत पोंचल्यावर नळांतून पाणी येण्याऐवजीं एकदम तेलाचा फवारा उडाला. पाकिस्तानांतील तज्ज्ञ आतां ह्या विहिरीची तपासणी करीत आहेत.


॥ श्री ॥

## दि बृहन्महाराष्ट्र शुगर सिंडिकेट लि., पुणें-२

—: २६ जानेवारी :—

**प्रजासत्ताक दिनानिमित्त**

आमचे भागीदार, ठेवीदार व हितचिंतक यांना अभिवादन व शुभेच्छा.

चालू हंगामाचें साखरेचें उत्पादन जोरांत चालू असून आतापर्यंत साखरेचें उत्पादन जवळजवळ एक लक्ष पोतीं झालें आहे.


**भारतीय प्रजासत्ताक चिरायु होवो !**

के. त्र्यं. चांफेकर, B. E., A. M. I. E., मॅनेजर.

शं. ल. लिमये, B. Sc., LL. B., अध्यक्ष.

## आमदार शि. म. काळे

### ( ओळीनें तीन वर्षे एकमतानें निवडून आलेले पुणें सेंट्रल को-ऑप. बँक लि. चे अध्यक्ष )



पुणें सेंट्रल को. ऑप. बँकेच्या नुकत्याच झालेल्या वार्षिक निवडणुकींत श्री. शिवाजीराव काळे यांची बँकेचे अध्यक्ष म्हणून बिनविरोध निवडणूक झाली. ह्या निमित्तानें यांचा परिचय देण्याची संधी आज आम्हांला मिळत आहे.

सन १९२८ मध्यें जुन्नर तालुक्यांतल्या अमरापूर या गांवीं शिवाजीरावांचा जन्म एका सात्विक आणि प्रेमळ शेतकरी कुटुंबांत झाला. जुन्नर तालुक्यांतल्या शिवनेरीच्या ऐतिहासिक आसमंतांतल्या डोंगरकपारींचा कणखरपणा आणि निसर्गाची विशालता, भव्यता शिवाजीरावांच्या बाळपणांत केव्हांच रुजली गेली होती.

शिक्षणानं होत असलेल्या बौद्धिक उन्नतीबरोबरच शिवाजीरावांनीं शारीरिक उन्नतीचंहि साध्य डोळ्यांसमोर ठेवलं होतं. आणि उत्कृष्ट शारीरिक संपदा निर्माण करण्याचे दृष्टीनें त्यांनीं अविरत साधना केली. आजहि त्यांची भव्य आणि रुबाबदार दिसणारी देहयष्टि त्यांच्या ह्या साधनेची साक्ष पटविते. "शरीरमाद्यं खलु धर्मसाधनम्" हें ध्येय त्यांनीं केवळ स्वतःच्याच अंगीं बाणवलं असं नव्हे तर स्वतःबरोबर त्यांनीं आपल्या अनेक सवंगड्यांना या ध्येयाचं महत्त्व पटवून दिलं होतं. चार-चौघांना एकत्र जमवून त्यांच्यांत एखाद्या गोष्टीबद्दल आवड निर्माण करणं ही कला वाटते तितकी सहजसाध्य आणि सोपी नाहीं. पण शिवाजीरावांनीं ही कला हस्तगत केली होती. भावी आयुष्यांत सहकारी चळवळींतल्या यशाचें बीज लहानपणाच्या या त्यांच्या सांघिक वृत्तींतूनच फोफावत होतं.

वाढत्या वयाबरोबर अनेक अनुभवांशीं आणि प्रसंगांशी शिवाजीरावांना टक्कर द्यावी लागली. १९४२ च्या क्रांतीनं भारताचा कानाकोपरा व्यापला होता. खेड्यांपाड्यांतल्या आबालवृद्धांना राजकीय जाग आली होती. शिवाजीरावांसारखा धडाडीचा उमदा तरुण त्याला अपवाद असणं शक्य नव्हतं. त्यांच्या उमेदीला हा प्रसंग म्हणजे जणू एक आव्हानच होतं. १९४५ मध्यें प्रत्यक्ष राजकीय कार्याला त्यांनीं सुरुवात केली.

समाजकार्यालाहि सुरुवात त्यांनीं याच वेळीं केली. ग्रामीण जनतेचा उत्कर्ष व्हावयाचा असेल तर साक्षरता ही बाब आवश्यक आहे या जाणीवेनं सभोंवतालच्या खेडोपाड्यांत शाळा सुरू करण्याचें पवित्र कार्य त्यांनीं हातीं घेतलें. अनुभवी शिक्षकांच्या आणि ग्रामस्थांच्या सहाय्यानं विद्यादानाचं हें लेणं त्यांनीं जुन्नर तालुक्यांतल्या प्रत्येक खेड्यांत नेऊन पोंचविलें.

सामाजिक सुधारणांमध्यें शिक्षणानंतर ग्रामसुधारणाहि अत्यंत महत्त्वाची आहे. त्या दृष्टीनें पावलें टाकून शिवाजीरावांनीं तालुक्यांतल्या ग्रामस्थांना ग्रामपंचायतीचें महत्त्व, तिचें कार्य, परस्परांच्या जबाबदाऱ्या, परस्पर सलोखा, श्रमदान, स्वयंपूर्णता आणि त्यापासून होणारे फायदे, या सर्व गोष्टींचा परिचय करून दिला; इतकेंच नव्हे तर त्यांनीं या सर्व गोष्टी त्यांच्या मनावर बिंबवल्या.

शांततेच्या मार्गानं देशाची भरभराट साधण्याचें एक प्रमुख साधन म्हणून 'सहकारा'ला मान्यता मिळालेली आहे. सहकाराचें महत्त्व प्रत्येक भारतीय नागरिकाच्या अंगीं बाणविण्याचें कार्य म्हणजेच देशकार्य. जुन्नर तालुक्यांतल्या सहकारी चळवळीचें पुढारीपण अर्थातच शिवाजीरावांनीं अंगिकारलें हें सांगण्याची आवश्यकता नाहीं. गांवोगांव सहकारी संस्था स्थापन करण्यास त्यांनीं उत्तेजन दिलें. या उत्तेजनांतूनच तालुक्यामध्यें अनेक सहकारी शेतकी सोसायट्यांनीं आकार घेतला. जुन्नर तालुका सहकारी खरेदी-विक्री संघ हें एक ठळक उदाहरण म्हणून सांगतां येईल.

जुन्नर तालुक्यांतल्या त्यांच्या या अविश्रांत आणि तळमळीच्या कार्यातूनच त्यांची लोकप्रियता दिवसेंदिवस वाढत होती. एक झुंजारवृत्तीचा, मेहेनती, कणखर आणि आदर्श नेता म्हणून जुन्नर तालुकाच नव्हे तर पुणें जिल्हा त्यांना आदरानं मानूं लागला. जुन्नर तालुक्यांतल्या जनतेचा अमाप विश्वास त्यांनीं संपादन केला होता. विधानसभेंतल्या त्यांच्या निवडणुकीमागें जनतेचा विश्वास हीच पार्श्वभूमि आहे. शिवाजीरावांनीं अर्थातच या गोष्टींची जाणीव ठेवली. विधानसभेंत निरनिराळ्या विषयांवरील आपलीं मतें ते अत्यंत निर्भिडपणें आणि स्पष्टपणें व्यक्त करतात. तालुक्यांतल्या स्थानिक अडीअडचणींहि ते आस्थेवाईकपणें चौकशी करून त्या सोडविण्याचा आटोकाट प्रयत्न करतात.

पुणें जिल्ह्यांतील प्रमुख सहकारी संस्थांवर ते प्रातिनिधित्व करीत असलेनें तसेंच सहकारी चळवळीचा जातीनें पुरस्कार व प्रचार करीत असल्यानें त्यांच्या अनुभवी ज्ञानाचें मोल ओळखून महाराष्ट्र राज्य सरकारनें नवीन सहकारी कायद्यासंबंधींच्या समितींत सभासद म्हणून त्यांची नेमणूक केली. नवीन सहकारी विधेयक तयार होत असतांना शिवाजीरावांनीं बहुमोल अशा सूचना केल्या.

तीन वर्षांपूर्वीं पुणें सेंट्रल को. ऑप. बँकेच्या अध्यक्षपदावर प्रथम त्यांची निवडणूक झाली. आपल्या अचूक मार्गदर्शनानं त्यांनीं बँकेच्या कर्जविषयक धोरणांत वेळोवेळीं बदल घडवून आणले. जिल्ह्यांतील, तालुक्यांतील, सोसायट्यांना भेटी दिल्यानंतर त्या सोसायट्यांच्या अगदीं अपरिचित सभासदाशीं सुद्धां ते अत्यंत आपुलकीनें आणि सौजन्यानें वागतात, बोलतात आणि त्या अपरिचित व्यक्तींच्या मनांत त्यांच्याविषयींच्या आदराचा एक ठसा नकळतपणें उमटून जातो. बँकेच्या सभासदांमध्यें आपुलकीची भावना निर्माण करण्यांत शिवाजीरावांनीं खरोखरच कौतुकास्पद यश संपादन केलें आहे. बँकेच्या अध्यक्षपदावर ओळीनें तीन वर्षे एकमतानें निवडून येण्यामध्येंच त्यांच्या यशाची साक्ष पटते.

शिवाजीरावांनीं पुढाकार घेतलेले हिरडा कारखाना आणि सिमेंट कारखाना हे लवकरच उत्पादनाचे कार्यास सुरुवात करणार आहेत. पुणें जिल्ह्यांतील, विशेषतः पश्चिम भागांतील जनतेच्या तांतडीच्या गरजा ते दोन कारखाने निश्चितपणें पूर्ण करतील.

आपल्या चिकाटीनं, प्रयत्नशील वृत्तीनं, धडाडीनं आणि झुंजारपणानं शिवाजीराव त्यांच्या आयुष्यांतलं उच्चतर यश लवकरच गांठतील असा विश्वास आम्हांला वाटतो.

## एप्रिल-सप्टेंबर, १९६१ मधील नवीन कंपन्या

१७७ कोटी रु. अधिकृत भांडवल असलेल्या ८५१ नव्या कंपन्या एप्रिल-सप्टेंबर, १९६१ ह्या सहामाहींत भारतामध्यें नोंदल्या गेल्या. ह्या ८५१ कंपन्यांपैकीं १० कंपन्या सरकारी असून त्यांचें अधिकृत भांडवल ६८ कोटी रुपये आहे. प्रायव्हेट सेक्टरनें नोंदलेल्या कांहीं प्रमुख कंपन्या खालीलप्रमाणें आहेत:—

### एप्रिल-सप्टेंबर १९६१ मध्यें प्रायव्हेट सेक्टरनें नोंदविलेल्या नवीन कंपन्या

| कंपनी | राज्य | अधिकृत भांडवल ( कोटी रु. ) |
|---|---|---|
| नॅशनल ऑरगॅनिक केमिकल इंडस्ट्रीज | महाराष्ट्र | १० |
| असोसिएटेड बेअरिंग कं. | ” | ७.५ |
| बोटॅनिअम | ” | ५ |
| प्रभात उद्योग | ” | ३ |
| कॅरिअर एअरकंडिशनिंग अँड रेफ्रिजरेशन | ” | २.५ |
| एशिॲटिक ऑक्सिजन | पं. बंगाल | २ |
| मॅकनली बर्ड इंजि. कं. | ” | २ |
| डब्ल्यु. एस. इन्सुलेटर्स ( इं. ) | मद्रास | २ |
| ओरिएंटल पॉवर केबल्स | मध्यप्रदेश | २ |
| राजेश टेक्स्टाइल मिल्स | गुजराथ | २ |
| इंडियन बेअरिंग | ” | २ |
| इंडस्ट्रियल स्टील मोल्डिंग अँड एक्सट्रॅक्टिंग कं. | ” | १.२५ |

### विहिरी खाणण्यासाठी रशियन यंत्रसामग्री

मद्रास सरकार आपल्या राज्यांतील विहिरी खोदण्याच्या योजनेसाठी रशियन यंत्रसामग्री वापरण्याचा विचार करीत आहे. सध्या दिल्ली येथें चालू असलेल्या औद्योगिक प्रदर्शनांत अशी रशियन यंत्रसामग्री पाहण्यासाठी ठेवण्यांत आली आहे. मद्रास सरकार आपला एक तज्ज्ञ ती पाहण्यासाठी व भारतामधील वापरास ती योग्य आहे का नाहीं हें अजमावण्यासाठी दिल्लीला पाठविणार आहे. यंत्रसामग्री सोयीची वाटली तर रशियाकडून ती विकत घेण्यांत येण्याचा संभव आहे. मात्र यंत्रसामग्रीची किंमत रुपयांत घेण्यांत येणार असेल तरच ती खरेदी करण्यांत येईल. विहिरी खणण्यासाठी मद्रास सरकारजवळ सध्या जीं ड्रिल्स आहेत तीं फार जुनीं झालीं आहेत. त्यामुळें सरकारची विहिरी खाणण्याची योजना बरीच मागे पडली आहे.

### महाराष्ट्रांतील खनिजांचें उत्पादन

खालील तक्त्यांत १९६० सालीं महाराष्ट्रांत झालेलें विविध खनिजांचें उत्पादन आणि त्यांची किंमत देण्यांत येत आहे.

| खनिज | प्रदेश | उत्पादन ( टन ) | किंमत ( रु. ) |
|---|---|---|---|
| अशुद्ध मॅंगेनीज | भंडारा | १,०३,४८४ | १,३२,२९,००० |
| | नागपूर | ८२,८७४ | ९७,३१,००० |
| | रत्नागिरी | ९९५ | ४५,००० |
| अशुद्ध लोखंड | चांदा | २,८३८ | १७,००० |
| | रत्नागिरी | ३,१७,४६२ | ६२,९३,००० |
| बॉक्साइट | कुलाबा | ७,६९३ | ५४,००० |
| चुनखडी | यवतमाळ | ३५,२६२ | १,०६,००० |
| कोळसा | चांदा | ६,९९,३५६ | १,५०,१६,००० |
| | नागपूर | ८९,४२१ | १९,१२,००० |

### सीलोनमधील हिंदी बँकांवर संपाचा परिणाम

सीलोनमधील बँकांतील नोकरांनीं संप केला आहे. पगाराच्या श्रेणींत सुधारणा करण्यांत यावी आणि पेन्शनरांना महागाईभत्ता द्यावा, अशा नोकरांच्या मुख्य मागण्या आहेत. संपामुळें बँकांतील व्यवहार थंडावले आहेत. राष्ट्रीयीकरण झालेली बँक ऑफ सीलोन व १० परदेशीय व्यापारी बँका संपाच्या वावटळींत सांपडल्या आहेत. त्यांत स्टेट बँक ऑफ इंडिया, ओव्हरसीज बँक आणि दि इंडिअन बँक ह्या हिंदी बँकाहि आहेत. ३,००० कर्मचाऱ्यांनीं संपांत भाग घेतलेला आहे. त्यामुळें कामाच्या वेळा कमी करण्यांत आल्या असून चेक वटविणें व बिलांचे व्यवहार एवढींच कामें करण्यांत येत आहेत.


अल्पावधींतच आम जनतेच्या विश्वासास पात्र ठरलेली **जनता सहकारी बँक लि. सांगली** कराळे बिल्डिंग, हायस्कूल रोड, सांगली

रजिस्टर नंबर २४०९८ ] दिवसेंदिवस प्रगतिपथावर असलेली ही बँक [ स्थापना १७ डिसेंबर १९६०

**आज आपला पहिला वाढदिवस साजरा करीत आहे**

बोलके आंकडे

| | आरंभीचे | सध्यांचे |
|---|---|---|
| अधिकृत शेअर भांडवल | रु. ५,००,००० | रु. ५,००,००० |
| खपलेलें व वसूल झालेलें शेअर भांडवल | रु. १,११,५०० | रु. १,४८,८४५ |
| एकूण ठेवी | रु. ७५,००० | रु. १,४७,५०० |
| एकूण खेळतें भांडवल | रु. १,८८,००० | रु. ७,३६,००० |

कळविण्यास आनंद होतो कीं, आतां आपली बँक द्वितीय वर्षांत पदार्पण करीत आहे. या प्रसंगीं आम्हीं सर्व खातेदार, ठेवीदार, सभासद, कर्जदार, आश्रयदाते व हितचिंतक यांनीं दिलेल्या सक्रिय सहकार्याबद्दल आभार मानून सर्वांनीं बँकेवरील प्रेम वाढतें ठेवावें अशी विनंती.

★ बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

★ आकर्षक व्याजाचे दरानें सर्व प्रकारच्या ठेवी स्वीकारल्या जातात.

एस्. एस्. पांड्याजी, मॅनेजर. वसंतराव ब. पाटील, व्हा. चेअरमन. एस्. एम्. कराळे, चेअरमन.

## विदर्भातील सहकारी चळवळ

१९५१ सालापासून विदर्भात १७२ विणकरांच्या सहकारी संस्था स्थापन करण्यांत आल्या. ह्या संस्थांच्या कार्यामुळें १९,००० विणकर सहकारी संस्थांच्या कक्षेत आले आहेत. सहकारी चळवळीची व्याप्ति वाढवून विदर्भातील सर्व विणकर सहकारी संघटनांच्या जाळ्यांत आणण्यांत आले पाहिजेत असें मत राज्याचे इमारत व दळणवळण खात्याचे मंत्री श्री. कन्नमवार ह्यांनीं व्यक्त केलें आहे. नागपूरमध्यें ५४ लाख रुपये खर्चून एक सुताची गिरणी काढण्यांत येणार आहे. ही गिरणी झाली म्हणजे विणकरांना लागणाऱ्या सुताचा प्रश्न समाधानकारक रीत्या सुटेल. प्रत्येक विणकराला दर मागामागें आतां ५०० रुपये मदत मिळणार आहे. पूर्वी ही मदत ३०० रु. इतकीच होती.

---

## रेल्वेला लागणारें साहित्य

रेल्वेला लागणाऱ्या अनेक प्रकारच्या सामानाचें उत्पादन आतां भारतांत होऊं लागल्यानें परदेशांवरील अवलंबन बरेंच कमी झालें आहे. इतर अनेक सामानाबरोबरच भारतांत आतां वाफेचीं रेल्वे एंजिनें, उतारूंचे व मालवाहतुकीचे डबे तयार होऊं लागले आहेत. कांहीं प्रकारच्या रेल्वेच्या सामानाची भारत लवकरच निर्यात करूं लागेल असा भरंवसा वाटत आहे. तिसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमांत मद्रास येथील डब्यांच्या कारखान्यांत अरुंद रुळांवर चालणारे १,६०० डबे तयार करण्यांत येतील. त्याशिवाय खाजगी मालकीच्या कारखान्यांतून आणखी १,५०० डबे तयार करण्यांत येतील. वाराणशी येथें डिझेल तेलावर चालणाऱ्या एंजिनांचा कारखाना काढण्यांत येणार आहे.

---

## भारी वजनाची विजेची यंत्रसामग्री

भारी वजनाची विजेची यंत्रसामग्री तयार करण्याचा भारतामधील पहिला कारखाना भोपाळ येथें चालू झाला आहे. अशाच प्रकारचे आणखी तीन कारखाने स्थापन करण्याचा विचार चालू आहे. त्यांपैकी एक हैद्राबाद राज्यांत व दुसरा तिरुचिरापल्ली येथें काढण्याचें घाटत आहे. ह्या दोन कारखान्यांसाठी झेकोस्लोव्हाकिआची मदत घेण्यांत येणार आहे. तिसरा कारखाना हरद्वारजवळ राणीपूर येथें स्थापन करण्यांत येणार असून त्यासाठी रशिआची मदत घेतली जाईल. तिन्ही कारखान्यांसाठी लागणारी अवजड यंत्रसामग्री पुरविण्यासाठीं आणखी एक ओतकामाचा कारखाना काढण्यांत येणार आहे. ह्या कारखान्याच्या उभारणीसाठी इंग्लंड, रशिआ, पश्चिम जर्मनी व स्विट्झरलंड ह्या देशांकडे विचारणा करण्यांत आली आहे.

---

## अणुशक्तीवर चालणारें दुसरें वीजकेंद्र

अणुशक्तीवर वीज निर्माण करावयाच्या दुसऱ्या केंद्रासाठीं जागा निवडण्याचें काम एका कमिटीवर सोंपविण्यांत आलें होतें. कमिटीनें आपलें काम पुरें केलें असून उत्तर प्रदेश, पंजाब व राजस्थानमधील दोन-तीन जागांची शिफारस केली आहे. संकल्पित अणुशक्ति वीजकेंद्रांत सुरुवातीला २ लाख किलोवॅट वीज निर्माण करण्यांत येईल. परंतु त्याची रचना अशी असेल कीं, विजेचें उत्पादन ४ लाख ते ५ लाख किलोवॅटपर्यंत वाढवितां यावें. केंद्रांत उत्पन्न करण्यांत येणारी वीज वरील राज्यांशिवाय दिल्ली शहरालाहि पुरविण्याचा इरादा आहे. हें वीजकेंद्र कॅनडानें पुरविलेल्या नमुन्याप्रमाणें असेल. ह्या पद्धतीच्या केंद्रांत नैसर्गिक युरेनिअमचा जळण म्हणून उपयोग करतां येतो.


सेवा आणि सुरक्षितता
यांसाठी
**दि बेळगांव बँक लिमिटेड**
रजिस्टर्ड ऑफिस : रविवार पेठ, बेळगांव
स्थापना ) (शेड्यूल्ड बँक) ( १९३०

| | | |
|---|---|---|
| वसूल भांडवल | रुपये | ८,००,००० |
| गंगाजळी | रुपये | ४,८६,००० |
| एकूण ठेवी | रुपये | १,७५,००,००० चे वर |

**बँक अल्प मुदतीच्या ठेवी**
आकर्षक व्याजाचे दरानें स्वीकारते.
—आजच चौकशी करा—
होम सेव्हिंग्ज डिपॉझिटवर व्याज ३%
एक ते पांच वर्षें मुदत ठेवीवर व्याज ४% ते ५%
सर्व तऱ्हेचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.

अ. रा. नाईक,
बी. ए., बी. एस्सी., एलएल. बी.
मॅनेजिंग डायरेक्टर



**दि मिरज स्टेट बँक, लि.**
हेड ऑफिस : मिरज
शेड्यूल्ड बँक : स्थापना १९२९

| | |
|---|---|
| वसूल शेअर भांडवल | : रुपये सहा लाख |
| खेळतें भांडवल | : रुपये एक कोट |
| रिझर्व्ह फंड व इतर फंड | : रुपये सात लाख |

बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

मुदत ठेवीवरील व्याजाचे आकर्षक दर

| | |
|---|---|
| १ वर्ष ३½% | ३ वर्षें ४¼% |
| २ वर्षें ४% | ४ वर्षें ४½% |

५ वर्षें ५%

**हेड ऑफिस मिरजमध्यें सेफ डिपॉझिट व्हॉल्टसूची उत्कृष्ट व्यवस्था.**

बँकेच्या शाखाः सांगली (गणपति पेठ), सांगली (मार्केटयार्ड), कुर्डूवाडी, बार्शी, पंढरपूर, करमाळा व लक्ष्मेश्वर.

श्री. एन्. पी. कानिटकर, ॲड्व्होकेट, चेअरमन. | के. डी. शिराळकर, मॅनेजर.


**वेतनांत फारशी वाढ नाहीं**—मध्यवर्ती सरकारच्या मजूर आणि रोजगार खात्यानें कामगारांच्या वेतनासंबंधीं एक अहवाल प्रसिद्ध केला आहे. त्यावरून असें दिसून येतें कीं, पहिल्या पंचवार्षिक कार्यक्रमाच्या कालांत व दुसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमाच्या बहुतेक कालखंडांत कामगारांच्या मूळ वेतनांत अगर त्यांना मिळणाऱ्या एकूण मेहेनतान्यांत फारशी वाढ झालेली नाहीं. १९५९ सालांत खाजगी उद्योगधंद्यांच्या क्षेत्रांत झालेल्या करारांची व औद्योगिक निवाड्यांची दखल अहवालांत घेण्यांत आली आहे. अहवाल नऊ प्रमुख उद्योगधंद्यांपुरताच मर्यादित आहे.

**तेलाच्या शोधासाठी मदत**—खनिज तेलाचा शोध करण्यासाठी भारताबरोबर करार करण्याची तयारी युगोस्लाव्हिआनें दाखविली आहे. गंगा नदीच्या खोऱ्यांत १०,००० फूट खोलीवर तेल सांपडूं शकेल, असा अंदाज तज्ज्ञांनीं केला आहे. ह्याच भागांत युगोस्लाव्हिआच्या मदतीनें तेलाचा शोध करण्यांत येणार आहे. जयसलमीर भागांत फ्रेंच तेल कंपनीच्या साह्यानें तेलाचा शोध करण्यांत येणार आहे.

**ऑक्ट्रॉय करांत वाढ करण्याची योजना**—अहमदाबाद शहरांत आयात करण्यांत येणाऱ्या कापसावरील जकातीच्या उत्पन्नांत वाढ करण्याच्या एका योजनेचा अहमदाबाद् कॉर्पोरेशन विचार करीत आहे. सध्यां ४० लाख बंगाली मण कापूस शहरांत आयात करण्यांत येतो व त्यावरील जकातीच्या रूपानें कॉर्पोरेशनला १० लाख रुपये मिळतात. नवी योजना अंमलांत आल्यास कॉर्पोरेशनला आणखी १२ लाख रुपये उत्पन्न होईल.

**सिमेंट कारखान्यांना लागणारें जळण**— सिमेंटचे जे कारखाने कोळशाच्या खाणींपासून दूर असतील त्यांनीं जळणासाठी कोळशाऐवजीं तेल वापरावें म्हणून मध्यवर्ती सरकार खटपट करीत आहे. अशा कारखान्यांना कोळशाचा पुरवठा करणें झाल्यास तो फार अंतरावरून करावा लागतो आणि त्यामुळें रेल्वेवर व बोटींवर बराच ताण पडतो. जळणाच्या तेलावरील अबकारी कर रद्द करण्याच्या प्रश्नाचा विचार चालू आहे.

**रखेली ठेवण्याच्या प्रथेविरुद्ध मोहीम**— हॉंगकॉंगमधील स्त्रियांच्या संघटनांनीं रखेली ठेवण्याच्या प्रथेविरुद्ध मोहीम सुरू केली आहे. चीनमध्यें ही पद्धत फार प्राचीन काळापासून चालत आलेली होती. ही प्रथा ४० वर्षांपूर्वी चीनमध्यें रद्द करण्यांत आली असली तरी हॉंगकॉंग ह्या ब्रिटिश वसाहतींत तिला अद्याप कायदेशीर स्थान आहे. या प्रथेची चौकशी करण्यासाठी नुकतीच एक सरकारी कमिटी नेमण्यांत आली होती. कमिटीनें रखेली ठेवण्याची पद्धत परंपरागत असल्यानें तीवर निर्बंध घालण्यांत यावे, पण एकदम बंद करण्यात येऊ नये, अशी शिफारस केली होती.

वेडेकर
मसाले, लोणचीं
व पापड
आपल्या जेवणांत
विशेष लज्जत
आणतील.
वापरून पाहा.
गुगभाट, मुंबई ४.
शाखाः ठाकुरद्वार, दादर, कोट व परळ.

५० वर्षांपेक्षा जास्त जनतेची सेवा करीत असलेलें मुंबईतील एक प्रसिद्ध निवासस्थान
★ सरदारगृह ★
प्रत्येक खोलींत स्वतंत्र बाथरूम व बाल्कनी
लग्नमुंजी वगैरे कार्यांची व भोजनपार्टींची कमी खर्चांत मनपसंत व्यवस्था
सभासंमेलनें यांची टिळक हॉलमध्यें सोय.
क्रॉफर्ड मार्केटजवळ, मुंबई २.

किर्लोस्कर
लोखंडी नांगर

भारी, मध्यम प्रतीच्या व रेताड जमीनीच्या सर्वोत्कृष्ट नांगरटीसाठीं निरनिराळ्या बनावटीचे लहान मोठे नांगर तयार होतात. आपल्या जमीनीच्या मगदुरा प्रमाणे योग्य अशा नांगराची निवड करा.
किर्लोस्कर ब्रदर्स लि.
किर्लोस्करवाडी
(जि सांगली)

# G. D. C. & A. Examination Results

The under mentioned candidates are hereby declared by the Co-operation and Accountancy Diploma Board to have passed the G. D. C. & A. Examination held in the month of October, 1961.

**(I) Poona Centre**

**(1)** Passed in the *whole Examination* including those who have passed in one or the other part previously.

**Pass Class**

Kanti Swarup, S. S. Thakar, C. P. Deshmukh, S. T. Bhide, V. G. Bhate, R. C. Deshetti, C. R. Joshi, G. J. Joshi, D. G. Khondre, J. M. Karne, T. B. Khedkar, A. H. More, N. R. Patil, S. E. Palwe, V. V. Sathe, M. S. Shimpi.

**(2) Passed in "Co-operation Group" only**

V. M. Kulkarni, S. G. Kulkarni, H. R. Sinari, M. P. Bhaltilak, A. N. Deshpande, J. H. Jadhav, B. V. Kulkarni, M. N. Mujawar.

**(3) Passed in "Accountancy Group" only**

V. V. Hasabnis, G. G. Mahajani, H. B. Mane, K. D. Pradhan, N. D. Sakhla.

**(4) Passed in "Banking Paper" only**

N. H. Lakhote.

**(II) Nagpur Centre**

**(1)** Passed in the whole Examination including those who have passed in one or the other part previously. Nil

**(2) Passed in "Co-operation Group" only**

R. S. Arbat, R. G. Bhandarkar.

**(3) Passed in "Accountancy Group" only**

Nil

**(III) The following candidats have secured exemptions as detailed below :—**

| *Name* | *Group* |
|---|---|
| V. S. Chandgadkar | II & III of Co-operation Group. |
| V. R. Gholap | III of Co-operation Group. |
| D. M. Inamdar | II & III of Co-operation Group. |
| P. S. Junnare | II & III of Co-operation Group. |
| M. M. Kolwadkar | II & III of Co-operation Group. |
| N. H. Lakhote | II & III of Co-operation Group. |
| S. A. Moati | II & III of Co-operation Group. |
| R. D. Patil | II & III of Co-operation Group. |
| R. D. Pande | II & III of Co-operation Group. |
| L. S. Sawant | I of Co-operation Group. |
| L. K. Thite | II & III of Co-operation Group. |
| P. N. Chirmade | V & VI of Accountancy Group. |
| P. G. Kenjale | V & VII of Accountancy Group. |
| S. M. Kuray | VI & VIII of Accountancy Group. |
| K. F. Parekh | VI of Accountancy Group. |
| M. S. Patil | V & VI of Accountancy Group. |
| V. L. Shah | V & VI of Accountancy Group. |
| V. K. Shirode | V & VII of Accountancy Group. |

(IV) In addition to the above the following candidates are declared to have passed the full G. D. C. and A. Examination in pursuance of Regulation No. 3 of the Regulation for the Award of G. D. C. & A.

P. I. Desai, C. S. Rathod, M. M. Vyas, S. J. Paithankar, R. B. Kulkarni, B. G. Doshi, P. G. Thakkar, J. K. Vasavada, D. P. Aphale, J. K. Patel.

Poona 1
27-12-1961

**L. N. Bongirwar**
*Registrar and Chairman*


भारतातील प्रमुख नागरी सहकारी बँक!

सारस्वत को-ऑपरेटिव्ह बँक लि.

सारस्वत बँक बिल्डिंग, गिरगांव, मुंबई ४.


| | |
|---|---|
| वसूल भांडवल | रु. ९·०८ लक्ष |
| रिझर्व्ह व इतर फंडस् | रु. १०·७६ लक्ष |
| ठेवी | रु. २६५·८७ लक्ष |
| खेळतें भांडवल | रु. २१५·९५ लक्ष |

शाखा : फोर्ट, दादर, माहीम, वरळी, वडाळा, पुणें व बेळगांव. महिला शाखा : सारस्वत बँक-गृह, निकद्वारी लेन, मुंबई ४.



स्थापना १९१८

शेतकरी बंधूंना खुषखबर



तुमच्या ५ हॉ. पॉ. एंजिनकरितां

स्पेशल टाईप १४" चक्की

संपूर्ण सुधारलेली यंत्र-योजना

तसेंच १६" व १८" चक्क्यांसाठीं

भिडे अॅण्ड सन्स प्रा. लि., सांगली.

# दि बँक ऑफ कराड लि.

हेड ऑफिसः—कराड

( शाखाः—सातारा, इस्लामपूर, तासगांव, विटें )

चेअरमन :—श्री. ना. बा. बुधकर, B. A., LL. B., वकील

व्हाईस चेअरमन :—श्री. महादेव रामचंद्र देशपांडे

१ ते ५ वर्षे मुदतीच्या ठेवीवरील व्याजाचा दर

द. सा. द. शें. ४ ते ५ रु.

ग्राहकांना चीज-वस्तु सुरक्षित ठेवण्यासाठी कराड येथें बँकेच्या इमारतींत सेफ डिपॉझिट व्हॉल्टची सोय.

इस्लामपूर व तासगांव शाखेंत लॉकर्सची सोय.

बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

म. वि. खंडकर,
मॅनेजर.

गोवामुक्तीमुळें भारताची एक मोठी काळजी दूर झाली आहे.

तथापि त्याचबरोबर भारताची आर्थिक जबाबदारीहि वाढली आहे.

# भारताची आर्थिक जबाबदारी पेलण्यासाठी आपल्या सहायाची आवश्यकता आहे.

आपल्या मिळकतींतून कांहीं रकमेची आपण नियमितपणें बचत केल्यास आपणहि असें सहाय्य करूं शकाल.

आपल्या बचतीचा योग्य विनियोग करणारें पुण्यांतील एकमेव सहकारी अर्थकेन्द्र.

# पुणें सेंट्रल को-ऑप. बँक लि.,

लक्ष्मी पथ, पुणें २.

म. मो. देशमुख,
कार्यकारी संचालक.


---


सहकारी तत्त्वावर शेतकऱ्यांच्या उन्नतीसाठी सतत प्रयत्न करीत असलेला—

# पुणें जिल्हा सहकारी खरेदी-विक्री संघ लिमिटेड

तार :— SANCOSOP ] १९१, भवानी पेठ, पुणें १. [ फोन :—३११५

आपल्यासाठीः—

★ संस्थेनें साडेपांच लाख रुपये खर्च करून शेतीमधील नाशवंत मालासाठी अद्यावत् शीतगृह विकत घेतलें आहे. त्या ठिकाणीं भाजीपाला, फळफळावळ, अंडीं, दुधाचे पदार्थ चांगल्या रीतीनें राहूं शकतात.

★ भरघोस उत्पादनासाठी उत्कृष्ट खतांचा पुरवठा करीत आहे. तसेंच संघानें स्वतःचें मिश्रखत उसासाठी व भाजीपाल्यासाठी तयार केलेलें आहे.

★ शेती मालाच्या किफायतशीर विक्रीसाठी हुकमी गिऱ्हाईक मिळविण्याची व्यवस्था केली आहे.

★ शेतकऱ्यांना लागणारीं खतें, बीं-बियाणें, अवजारें, लोखंड, सिमेंट, पत्रा, वगैरे माल नियंत्रित दरांत पुरविण्याची व्यवस्था संघामार्फत होत असते.

★ उत्तम प्रकारचा आंबेगांवचा निर्भेळ आंबेमोहोर तांदूळ ४० किलोच्या पिशव्यांमध्यें विक्रीस ठेवला आहे.

★ खात्रीचे स्नो-बॉल कॉली-फ्लॉवरचें बीं परदेशांतून मागवून विक्रीसाठी ठेवलें आहे.

संस्थेचें खेळतें भांडवल : रु. ६५,७५,००० ★ व्यापार २ कोटींचे वर

मुगुटराव साहेबराव काकडे देशमुख, अध्यक्ष.
बबुराव बळवंतराव धुमाळ, उपाध्यक्ष.
श्री. म. उपळेकर, एम्. ए., एलएल्. बी., कार्यकारी संचालक.
सं. सा. काकडे, बी. ए., एलएल्. बी., व्यवस्थापक.

## पुन: गाडगीळ

"सेंट्रल बँक ऑफ इंडिया लि. चा सुवर्णमहोत्सव चंदिगड येथें पंजाबचे गव्हर्नर, श्री. न. वि. गाडगीळ ह्यांच्या अध्यक्षतेखाली साजरा करण्यांत आला, त्या वेळीं त्यांनीं भारतांतील बँकांचें राष्ट्रीयीकरण केलें पाहिजे, असें सांगितलें. भारत सरकारचें असें धोरण नसल्याचें जाहीर असतांनाहि, प्रायव्हेट सेक्टरमधल्या अग्रेसर बँकेच्या सुवर्ण महोत्सवाचे प्रसंगीं, तिचा पायाच मान्य करण्याची तयारी नसणाऱ्या राज्यपाल महाशयांनीं महोत्सवांत भाग घेण्यास नकार देणें शिष्टसंमत झालें असतें. बेजबाबदारपणें बँकांच्या राष्ट्रीयीकरणाचा पाठपुरावा करीत असतांनाच 'सेंट्रल बँक योग्य व्यवहार आणि देशाची सेवा ह्यांचा समन्वय साधण्याची आपली दीर्घ परंपरा अशीच चालू ठेवील' अशी आशाहि त्यांनीं व्यक्त केली!"—इंडियन एक्स्प्रेस.

## हें भविष्य पडताळून पाहा

१९६२ च्या फेब्रुवारीच्या ४ तारखेला अष्टग्रहांची युति होणार आहे. अशा प्रकारची युति २५,९०० वर्षांनीं होत आहे, अशी महिती ज्योतिषांतील तज्ज्ञ सांगत आहेत. ह्या युतीचा परिणाम म्हणून जगांत भूकंप, प्रचंड भरत्या, वादळें, अपघात, आग, इत्यादींचें थैमान होणार असल्याचीं भविष्यें वर्तविण्यांत येत आहेत. भविष्यकथनांत पाश्चात्त्य देशांतील प्रमुख ज्योतिषीहि सामील आहेत. भारतामधील प्रसिद्ध ज्योतिषी राजगुरु रामकृष्ण पंडित ह्यांनीं असें भविष्य वर्तविलें आहे कीं, १९६४ पासून माणसामाणसांतल्या समजुतदारपणाच्या युगाला प्रारंभ होईल, शांततामय जीवन वाढीस लागेल, वसाहतशाही संपेल आणि नैतिक व आध्यात्मिक मूल्यांना मान मिळूं लागेल.

## जर्मनींत हिंदी संस्कृतीचा अभ्यास

पश्चिम जर्मनीचें सरकार भारतीय संस्कृतीचा अभ्यास करण्यासाठी भारतांत एक केंद्र स्थापन करण्याच्या विचारांत आहे. ह्या केंद्रांत प्राचीन भारतीय वाङ्मयाचा आणि उत्खनित अवशेषांचा अभ्यास करण्यात येईल. जर्मनींत इंडॉलजी हा विषय विद्यापीठांतून मान्यता पावलेला आहे. सहा जर्मन विद्यापीठांतून तो शिकविण्याची सोय आहे. आणखी आठ जर्मन विद्यापीठांतून ह्या विषयावर खास व्याख्यानें देण्यात येत असतात. भारतीय संस्कृतीच्या विविध अंगांवर व्याख्यानें देण्याचें काम अभ्यासू प्राध्यापकांकडून करवून घेण्यांत येतें. पश्चिम जर्मनींतील कील आणि माइझ ह्या विद्यापीठांतून इंडॉलजी हा विषय नव्यानें ठेवण्यांत येणार आहे.

## दिल्लींत मोठ्या बाजाराची स्थापना

१९६२ च्या मध्यापर्यंत दिल्लींत एका मोठ्या बाजाराची स्थापना करण्यांत येणार आहे. इंडिअन कोऑपरेटिव्ह युनिअनतर्फे तो उघडण्यांत येणार असून त्यासाठी ३० लाख रुपये खर्च येईल असा अंदाज आहे. बाजाराच्या ह्या योजनेला मध्यवर्ती सरकारनें तत्त्वतः मान्यता दिली आहे. ह्या बाजारांत गिऱ्हाइकांना स्पर्धेच्या दरांत माल विकला जाईल. त्याशिवाय दिल्ली शहरांत आणखी २५ छोटे बाजार उघडण्यांत येणार आहेत. ह्या छोट्या बाजारांना लागणारा माल पुरविण्याचें कामहि मोठा बाजार करणार आहे. ग्राहकांची सोय करण्यासाठी एकमेकांना जोडलेले बाजार उघडण्याची दिल्लींतील ही पहिलीच योजना आहे.

## लोकसंख्येच्या प्रश्नासाठी स्वतंत्र खातें हवें

भारताच्या कुटुंबनियोजन संघटनेच्या अध्यक्ष श्रीमती धनवंती रामराव ह्यांच्या हस्तें अर्णाकुलम येथें संघटनेची शाखा स्थापन करण्यांत आली. ह्या प्रसंगीं भाषण करतांना त्या म्हणाल्या कीं, मध्यवर्ती सरकारांत कुटुंबनियोजनाच्या कामासाठी स्वतंत्र खातें उघडण्याची आवश्यकता आहे. कुटुंबनियोजनाचा कार्यक्रम अमलांत आणण्यासाठी ह्या खात्याचा सरकारच्या इतर संबंधित खात्यांशीं संबंध जोडण्यांत आला पाहिजे. भारतामधील लोकसंख्येचा प्रश्न अतिशय तांतडीचा झाला आहे. बेलगामी मातृत्वाला ताबडतोब आळा घालण्यांत आला पाहिजे; तरच कांहींतरी घडणार आहे. तिसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमांत कुटुंबनियोजनाच्या कामासाठी २० कोटी रुपयांची रक्कम मंजूर करण्यांत आलेली आहे.

## हिंदी शास्त्रज्ञांना अपुरे पगार

कॅलिफोर्निआ इन्स्टिटयूट ऑफ टेक्नॉलजीचे प्रा. डु मॉंड हे इंडिअन सायन्स कॉंग्रेसच्या अधिवेशनासाठी भारतांत आले होते. त्यांनीं भारतामधील शास्त्रीय व तांत्रिक संशोधनाच्या विविध संस्थांना भेटी दिल्या. संस्थांत काम करणाऱ्या शास्त्रज्ञांविषयीं बोलतांना ते म्हणाले कीं, हिंदमधील शास्त्रज्ञांना व तंत्रज्ञांना आकर्षक पगार देण्यांत येत नाहींत. त्यामुळें उत्तम प्रतीचीं बुद्धिवान् माणसें संशोधकाच्या पेशाकडे आकृष्ट होणार नाहींत. भारताला जुन्या चाकोरींतून बाहेर काढण्याच्या कामीं अखेर ह्यांचाच सर्वांत अधिक उपयोग होणार आहे. तेव्हां एखाद्या धंदेवाइकाला अगर राजकारण्याला मिळतो त्यापेक्षांहि कमी पगार त्यांना मिळणें केव्हांहि योग्य होणार नाहीं. त्यामुळें परिणामतः हिंदचेंच नुकसान होईल.

## पाकिस्तानमधील बोलपटाचा धंदा

पाकिस्तानमधील बोलपटनिर्मितीचा धंदा अलीकडे बऱ्याच अडचणींत सांपडलेला आहे. परंतु आतां त्याची परिस्थिति अतिशय डबघाईची झाली आहे. त्यांतच स्टुडिओचे चालक व कामगार ह्यांचे संबंध दुरावलेले आहेत. त्यामुळें हा धंदा बसतो कीं काय असें संबंधितांना वाटूं लागलें आहे. लाहोर येथील मलिक स्टुडिओजमधील काम कांहीं दिवसांपूर्वी अचानक बंद पडल्याची वार्ता आहे. त्याचप्रमाणें शहानूर स्टुडिओजचे चालकहि स्टुडिओ बंद करण्याच्या विचारांत आहेत. ह्या धंद्यांतील एका प्रमुखानें नुकतेंच असें सांगितलें आहे कीं, धंद्यांतील अडचणींचें निवारण करणें दिवसानुदिवस अशक्य होत चाललें आहे. पाकिस्तानच्या सरकारनें जर योग्य उपाययोजना केली नाहीं तर हा धंदा लवकरच नामशेष होईल.

## गोव्याच्या मुक्तीमुळें व्यापाराला चालना

गोव्याच्या मुक्तीमुळें उत्तर कर्नाटक भागांत आनंदाचें वातावरण पसरलें आहे. गोव्याच्या सरहद्दीपैकी बरीच मोठी सरहद्द कर्नाटकाला लागून आहे. गोव्यांतील नैसर्गिक बंदर मार्मगोवा हें लोंढा रेल्वेमार्गानें उत्तर कर्नाटकाशीं जोडलें गेलें आहे. त्यामुळें परदेशांशीं व्यापार करण्यास तें फार सोईचें आहे. सध्यां कर्नाटकाचा बहुतेक परदेशीय व्यापार मुंबई अगर मद्रास ह्या बंदरांच्या द्वारां चालतो. रेल्वेनें थेट जोडलें गेलेलें असें बंदर कर्नाटकाला नाहीं. कर्नाटक आणि दक्षिण महाराष्ट्र ह्यांना लागणारा परदेशीय माल मार्मगोव्याच्या द्वारां आयात करणें अधिक सोईचें होणार आहे. गोव्यांतील परिस्थिति स्थिरस्थावर झाली म्हणजे कर्नाटकाच्या व्यापाराला जोराची चालना मिळेल अशी अपेक्षा आहे.

## कायद्याविरुद्ध बिगर-समासदांस दिलेलें कर्ज सोसायटीस वसूल करतां येईल काय ?

कायद्याविरुद्ध बिगर–सभासदांस दिलेलें कर्ज सहकारी संस्थेस कायद्यानें वसूल करतां येतें काय ? असा प्रश्न उत्पन्न झाला असतां, तें तिला वसूल करतां येतें, असा महत्त्वपूर्ण निकाल पुणें येथील डिस्ट्रिक्ट जज्ज मि. एम. एल. बुटाणी यांनीं नुकत्याच एका अपिलांत दिला. पूना अर्बन को-ऑपरेटिव्ह बँकेनें बँकेचा एक सदस्य व त्याचा बिगर-सभासद भाऊ यांस उभयतांचे मालकीचे घराचे गहाणावर कर्जाऊ रु. १,००० दिले. त्याचे व्याजासुद्धां १,८०० रुपये वसूल करण्यासाठी बँकेनें लावलेल्या दाव्यांत बँकेला सि. जज्ज मि. संसारी यांनीं हुकूमनामा दिला. त्या निकालाविरुद्ध बिगर–सभासद कर्जदारानें बँकेविरुद्ध अपिल लावून को-ऑपरेटिव्ह कायद्यानें बिगर–सदस्यांस कर्ज देण्यास लख्ख मनाई आहे, व सदस्याविरुद्ध लवादाखेरीज दिवाणी कोर्टांत दावा चालत नाहीं, या मुद्यावर फिर्याद रद्द करणेची मागणी केली. त्यावर बँकेचें म्हणणें असें कीं, बिगर-सदस्यांस कर्ज देणें हें जरी कायद्याच्या कक्षेंत नसलें, तरी अंतर्गत व्यवस्थेकरितां तें नियंत्रण आहे, व रक्कम स्वीकारल्यानंतर ती परत करण्याची जबाबदारी ऋणकोवर कायद्यानें पडेलच. नियंत्रण न पाळल्याबद्दल सर्वसाधारण सभा अगर रजिस्ट्रार संचालक मंडळाची फार तर कानउघाडणी करील; शिवाय कायद्याविरुद्ध दिलेलें कर्ज धनकोस दिवाणी कोर्टाकडून वसूल करतां येतें, असे लाहोर व मुंबई हायकोर्टाचे आधार दाखविण्यांत आले व अपील कोर्टानें ही गोष्ट मान्य करून अपील नामंजूर करून अर्बन बँकेस खर्चासुद्धां हुकूमनामा दिला. याच अपिलांत दुसरा गहाणदार धनको दि बँक ऑफ महाराष्ट्र लि. यानेंहि आपल्या येणें रकमेचा समावेश हुकूमनाम्यांत करणेबद्दलची मागणी केली होती. तीहि अपील कोर्टानें मान्य केली.

---

## कर्मयोगी डॉ. हॅरोल्ड एच. मॅन

डॉ. हॅरोल्ड एच. मॅन ह्यांनीं मुंबई इलाख्यांतील शेती आणि शेतीविषयक शिक्षण ह्यासाठी केलेली महत्त्वपूर्ण कामगिरी सुप्रसिद्ध आहे. त्यांचें २ डिसेंबर रोजीं निधन झालें. ते मुंबई सरकारच्या नोकरींत ॲग्रिकल्चरल केमिस्ट म्हणून १९०७ सालीं लागले आणि पुढें पुणें येथील शेतकी कॉलेजचे प्रिन्सिपॉल झाले. १९१८ मध्यें त्यांची डायरेक्टर ऑफ ॲग्रिकल्चर म्हणून नेमणूक झाली. १९२८ सालीं ते इंग्लंडला परत गेले. तेथें त्यांनीं वोबर्न एक्सपर्मेंटल स्टेशनमध्यें आपलें संशोधनकार्य चालू ठेवलें. भारतांत ते १९०० सालीं प्रथम आले, ते इंडियन टी असोसिएशनचे सायंटिफिक ऑफिसर म्हणून. चहाची लागवड आणि चहाच्या झाडांवर पडणाऱ्या किडीवर प्रतिबंधक इलाज, ह्या बाबतींत डॉ. मॅन हे अधिकारी गणले जात होते. १९३० हे १९४०च्या दरम्यान त्यांनीं रशिया, पूर्व आफ्रिका, इत्यादि देशांत जाऊन तेथील चहाच्या लागवडीबाबत सल्ला दिला. रशियांत तर त्यांना "रशियन चहाचे पिताजी" मानलें जातें. सुमारें ६० वर्षें सतत कामगिरी केल्यावर वयाच्या ८९ व्या वर्षीं, डॉ. मॅन निवर्तले. गेल्याच वर्षीं, ४७ वर्षें वैवाहिक जीवनानंतर, त्यांची पत्नी निधन पावली. त्यामुळें त्यांच्या कार्यांत कांहीं दिवस खंड पडला, पण त्यांनीं लागलीच पुनः पूर्ववत् काम सुरू केलें. प्राध्यापक गाडगीळ ह्यांच्या "चेंजिंग इंडिया" ह्या पुस्तकाचें परीक्षण ते लिहीत होते, त्याच सुमारास त्यांना पक्षघातानें पछाडलें, आणि त्यांतच त्यांचा अंत झाला.


# दि अष्टा को-ऑ. अर्बन बँक लि. अष्टा

र. नं. १५१८ ] [ स्थापना २०।१।१९४७

—: बँकेची सांपत्तिक स्थिति :—

| | |
|---|---|
| अधिकृत शेअर भांडवल | रु. १,००,००० [एक लाख रुपये |
| खपलेलें व वसूल भाग भांडवल | रु. १,००,००० [एक लाख रुपये |
| ठेवी | रु. ३,७५,००० |
| खेळतें भांडवल | रु. ६,००,००० |

—: बँकेचें कामकाज :—

( १ ) सोनें तारण व माल तारणावर माफक व्याजाचे दरानें कर्जें दिलीं जातात.
( २ ) विमा कॉर्पोरेशन व वेस्टर्न इंडियाचे ह्प्ते विनामूल्य स्वीकारले जातात.
( ३ ) सर्व तऱ्हेचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.
( ४ ) आकर्षक व्याजाचे दरानें ठेवी स्वीकारल्या जातात.
( ५ ) व्याजाचे दरांसंबंधीं समक्ष भेटा.

एन. ए. रुकडे, मॅनेजिंग डायरेक्टर.
रामगोपाळ पन्नालाल झंवर, चेअरमन.



# दि कराड सहकारी खरेदी-विक्री सोसायटी लि., कराड. जि. सातारा

र. नं. ७८०८ ] फोन नं. ६८ [ स्थापना १९३७

**समासद व शेतकरी बांधवांना नम्र विनंती**

शाखा :—उंब्रज, चिपळूण, सांगली.
डेपो :—ओगलेवाडी, शेणोली.

संस्थेची सांपत्तिक स्थिति :

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. २,००,००० |
| वसूल शेअर भांडवल | रु. १,६८,२७५ |
| रिझर्व्ह फंड | रु. ७५,३९९ |
| इतर फंड | रु. १,५८,६२५ |
| ठेवी | रु. २,४९,८४५ |
| बँक कर्ज | रु. ११,७५,००० |

*संस्थेकडे मालविक्रीचे फायदे :—*

(१) मालाची विक्री, वजन, काळजीपूर्वक कसोशीनें केलें जातें.
(२) मालावर ॲडव्हान्स देऊन माल सांठविणेस गोडाऊनची सोय केली आहे.
(३) शेती उपयोगी सर्व प्रकारचीं तेलें, पेंड व मिश्रखतें पुरविलीं जातात.
(४) मालविक्रीचे प्रमाणांत बँकेकडून भरपूर कर्जपुरठा करण्याची सोय आहे.
(५) तंबाखूचा माल सांठवण, ॲडव्हॉन्स व फायदेशीर विक्रीची सोय केली आहे.

भगवानराव नारायणराव जाधव, मॅनेजिंग डायरेक्टर.
अण्णाजी गोविंदराव पवार, चेअरमन.

## अशोक हॉटेलला नफा होऊं लागला

दिल्लीमधील अशोक हॉटेल ह्या राजशाही हॉटेलला आतां फायदा होऊं लागला आहे. १९६१-६२ च्या आर्थिक वर्षातील पहिल्या आठ महिन्यांत हॉटेलला सुमारें २१,७५,००० रुपये नफा झाला आहे. त्याशिवाय मार्च १९६१ ला संपलेल्या वर्षात २५,८४,००० रुपये निव्वळ नफा हॉटेलला झालेला आहे. घसारा, कर्जावरील व्याज, विकासासाठीं आलेला खर्च, इत्यादींची वेगळी तरतूद करण्यांत आलेली आहे. १९६०-६१ सालच्या ताळेबंदावरून ही गोष्ट स्पष्ट दिसून येते. ह्या हॉटेलला १९५९-६० साली प्रथमच ९,६९,००० रुपये नफा झाल्याचें नमूद आहे. ३१ मार्च, १९५९ अखेर पर्यंत हॉटेलला एकूण ५५,७६,००० रुपये तोटा आलेला होता, परंतु १९५९ नंतर होत गेलेल्या नफ्याची रकम ५७,२८,००० पर्यंत आल्यावर आतां हा तोटा सहजच भरून निघाला आहे. १९५६ मध्यें हें हॉटेल काढण्यांत आलेलें आहे. तेव्हांपासून १९५९-६० पर्यंत त्याला नफा झालेला नव्हता. त्यामुळें भागीदारांना नफाहि वांटण्यांत आलेला नव्हता. आतां मात्र नफा जाहीर करण्यांत येण्याची शक्यता आहे. अशोक हॉटेल एका लिमिटेड कंपनीमार्फत चालविण्यांत येतें. ह्या कंपनींत सरकारचें भाग भांडवल अधिकांश आहे. तें स्थापन झाल्यानंतर ३ वर्षेपर्यंत कांहीं नफा न झाल्यामुळें सरकारवर टीका करण्यांत येत होती. लोकसभेंतहि ह्या टीकेचे पडसाद उमटले होते. १९६०-६१ सालच्या अहवालावरून आणखी एक गोष्ट दिसून येते. प्रारंभीं ह्या हॉटेलमध्यें उतरणाऱ्या प्रवाशांची संख्या बेताचीच असे. सुरुवातीला दररोज सरासरी ८८ प्रवासी हॉटेलमध्यें उतरत असत. आतां ही सरासरी ३४६ पर्यंत वाढलेली आहे. अशोक हॉटेल हें फार महाग असल्यानें त्याचा उपयोग मुख्यत: परदेशीय प्रवासी व श्रीमंत हिंदी लोक ह्यांनाच होतो.

## गोव्यांतील लोखंडाच्या मातीची निर्यात

गोव्यांतील लोखंडाच्या मातीची आयात करणें जपानी व्यापाऱ्यांनीं स्थगित केलें आहे. जपान गोव्यामधून दरसाल ३० लाख टन लोखंडाची माती आयात करीत असतें. पंजीममधील एका मोठ्या कंपनीला पुढील पांच वर्षांत ५० लाख टन अशुद्ध लोखंड निर्यात करण्याचें कंत्राट मिळालेलें आहे. गेल्या वर्षीं ह्या कंपनीनें १० लाख टनांची निर्यात केली. बोट वहातूक कंपन्यांनीं जपानला न्यावयाच्या अशुद्ध लोखंडासाठी मार्मगोव्याला बोटी न पाठविल्यामुळें कंपनीची पंचाईत झाली आहे. भारत सरकारचें धोरण स्पष्ट झाल्यावर जपानी व्यापारी लोखंडाची आयात पुन्हा चालू करतील असा अंदाज आहे. दरम्यान पोलंडकडून गोव्यांतील अशुद्ध लोखंडाविषयी चवकशी चालू आहे.

## सहकारी साखर कारखाना

गुजरात राज्यांतील साखरेचा तिसरा सहकारी कारखाना मध्यवर्ती सरकारचे अर्थमंत्री श्री. मोरारजी देसाई ह्यांच्या हस्तें चालू करण्यांत आला. सुरत जिल्ह्यांतील हा दुसरा साखर कारखाना आहे. कारखान्याचें भांडवल ६० लाख रुपये आहे. त्याशिवाय खेळतें भांडवल २५ लाख रुपये आहे. गुजरात राज्य सरकारनें कारखान्यांत १५ लाख रुपये गुंतविले आहेत. कारखान्यांत रोज ५०० टन उस गाळला जाईल.

## सांस्कृतिक अभ्यासासाठी केंद्राची स्थापना

दिल्ली येथें जगांतील भिन्नभिन्न समाजांच्या संस्कृतींचा अभ्यास करण्यासाठी इंडिआ इंटरनॅशनल सेंटर ह्या नांवाची एक संस्था स्थापन करण्यांत आली आहे. जगांत अशा प्रकारची ही दुसरी संस्था असून तिच्यासाठी बांधण्यांत आलेल्या इमारतीचें उद्घाटन राष्ट्राध्यक्ष डॉ. राजेंद्रप्रसाद ह्यांच्या हस्तें झालें. ह्या संस्थेचें कामकाज पाहण्यासाठी ७ विश्वस्तांचें एक मंडळ नेमण्यांत आलें आहे. त्यांपैकीं ५ विश्वस्त कायम असतील. मंडळाचे अध्यक्ष डॉ.सी डी. देशमुख हे आहेत. दिल्ली येथें लोदी एस्टेट ह्या भागांत संस्थेसाठी एक प्रशस्त इमारत बांधण्यांत आली आहे. इमारतीचें आवार ४.८ एकर आहे. इमारत, जमीन व इतर साधनें मिळून केंद्रासाठी ५२ लाख रुपये खर्च आला आहे. त्यांपैकी ४० लाख रुपये अमेरिकेंतील जॉन डी. रॉकफेलर ह्यांनीं देणगी म्हणून दिले आहेत. ह्याशिवाय त्यांच्याकडून दरसाल १ लाख रुपयांप्रमाणें पहिलीं ५ वर्षेपर्यंत जादा मदत मिळणार आहे. भारतामधील सर्व विद्यापीठें आणि बऱ्याच औद्योगिक संघटना केंद्राच्या सभासद झालेल्या आहेत. जगांतील निरनिराळ्या भागांतील समाजांत स्नेहाचें आणि समजुतीचें वातावरण निर्माण करणें हें केंद्राचें ध्येय आहे. तें साध्य करण्यासाठी ह्या समाजांच्या प्राचीन व अर्वाचीन संस्कृतींचा अभ्यास करणें, एकमेकांच्या संस्कृतिविषयक ज्ञानाचा प्रसार करणें, इत्यादि उपाय योजण्यांत येणार आहेत. केंद्रांत अभ्यासासाठी येणाऱ्या विद्वानांची राहण्याची सोय करण्यांत आली आहे. अभ्यासकांसाठी १२ मोठ्या खोल्या आणि ४० छोट्या खोल्या बांधण्यांत आल्या आहेत. त्याचप्रमाणें त्यांची जेवणाखाण्याची सोय व्हावी, म्हणून एक अद्यावत् पद्धतीचें स्वयंपाकघरहि सज्ज करण्यांत आलें आहे. तेथें वाजवी दरानें भोजन मिळणार आहे.

## देवीच्या रोगावर औषध

ब्रिटनमध्यें आलेल्या देवीच्या साथींत, देवी आल्यावर त्या बऱ्या करण्यासाठी एका नव्या औषधाचा उपयोग करण्यांत येत आहे. ह्या औषधाचें नांव कापौंड ३३ असें असून तें पिवळ्या रंगाचें आहे. देवी झालेल्या रोग्याला सहा-सहा तासांनीं तें द्यावयाचें असतें. औषध तोंडानें घेण्याचें आहे. औषधाचा वापर मोठ्या प्रमाणावर करून मगच त्याची कार्यक्षमता ठरविण्यांत येणार आहे.

## नेपाळसाठी सिमेंटचा पुरवठा

नेपाळ सरकारच्या उद्योग खात्याकडून भारताकडे सिमेंटच्या पुरवठ्याची मागणी करण्यांत आली होती. त्याप्रमाणें भारत सरकारनें चालू वर्षांत ३०,००० टन सिमेंट नेपाळला पुरविण्याचें कबूल केलें आहे. सिमेंटशिवाय नेपाळला देण्यांत येणाऱ्या लोखंड व पोलादाच्या पुरवठ्यांतहि दुपटीनें वाढ करण्यांत येणार आहे.

## अंतरिक्ष जहाजाची कार्यक्षमता

रशियाचे दुसरे अंतरिक्ष प्रवासी मेजर टिटॉव्ह ह्यांनीं आपल्या वाहनांतून पृथ्वीभोंवतीं १७ प्रदक्षिणा घातल्या. इंडोनेशियांत एके ठिकाणीं बोलतांना त्यांनीं अशी माहिती सांगितली कीं, ज्या वाहनांतून त्यांनीं हा प्रवास केला त्यामधून अणुबॉंबच काय पण हैड्रोजनबॉंबहि नेता आला असता.

हें पत्र पुणें पेठ शिवाजीनगर घ. नं. ९१५/१ आर्यभूषण छापखान्यांत श्रीपाद वामन काळे यांनीं छापिलें व
' दुर्गाधिवास ' ८२३ शिवाजीनगर ( पो. ऑ. डेक्कन जिमखाना ) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.